पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १७९**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०८/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०८/०७/२०२० ची** साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **०८/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – शहर अभियंता, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.गलबले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.१५) फ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.११ घरकुल योजना चिखली येथील COVID CARE CENTER (CCC) चे D5, D6, D7, D8 या इमारती करिता तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा करण्यास नवीन वीजमीटर बसविणेबाबत.

विषय क्र.१६) सन २०१९-२० मधील व त्या पुर्वीच्या चालू असलेल्या विकास कांमांची बिले अदा करणेबाबत.

विषय क्र.१७) बालाजी विधी महाविद्यालय ताथवडे येथील कोविड १९ अलगीकरण केंद्रा करीता तात्पुरत्या स्वरूपात जनित्र संच व कामगार नियुक्त करणेबाबत.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

दि.०८/०७/२०१९ ची मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दि.१०/०७/२०२० रोजी दु.०२.३० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**सभापती -** बुधवार दि.०८/०७/२०२० ची मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दि.१०/०७/२०२० रोजी दु.०२.३० वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १७९**
(सभावृत्तांत)
( दिनांक ०८/०७/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – १०/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.०८/०७/२०२० दु.२.३० वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.१०/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा.सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
५. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
६. मा.संतोष बबन कांबळे
७. मा.अभिषेक गोविंद बारणे
८. मा.बुर्डे सुवर्णा विकास
९. मा.फुगे भिमाबाई पोपट

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.तुपे – सह शहर अभि. तथा प्र.अति.आयुक्त(३), मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.कैंद्र, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.जुंधारे, मा.गलबले – कार्यकारी अभियंता, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

(पवना नदी मधील जे घाण पाणी झालेले होते त्यामधील गाळ काढण्याचे कामकाजाला मान्यता दिलेली सल्यामुळे नदीतील सर्व गाळ निघुन गेलेला असल्यामुळे व नदी स्वच्छ झालेली असल्याने मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त व मा.तांबे - सह शहर अभियंता यांचे अभिनंदन करणेत आले.)

----------

ठराव क्रमांक – ७२२० विषय क्रमांक – ०१
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूमि/२/कावि/१८१/२०२०, दि.१७/०३/२०२०

विषय - संत तुकारामनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल प्रेक्षक गॅलरी प्रस्तावात नमूद जागेवरील गाळ्यांबाबत.

विषय क्र.१ चा विचार २९/०७/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२१ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११/२०२०, दि.०१/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.७८ दि.१३/०३/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.४५७२ दि.२८/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/२५८/२०१९ दि.२६/०६/२०१९ अन्वये प्रभाग क्र.१४ येथील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर व्यायामशाळा हि अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.१०/०२/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. प्रभाग क्र.१४ येथील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर व्यायामशाळा हि अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण यासंस्थेस दि.१२/०२/२०२० पासून पुढे व्यायामशाळा ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२२ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.आरची चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४८/२०२०, दि.०१/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.७९ दि.१३/०३/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.४५७४ दि.२८/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/२५७/२०१९ दि.२६/०६/२०१९ अन्वये प्रभाग क्र.९ खराळवाडी येथील बालभवन पुरूष व्यायामशाळा हि कामगार नगर मित्र मंडळ कामगार नगर पिंपरी १७ या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.३१/०१/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. संस्थेने दि.०६/०१/२०२० च्या अर्जाच्या मागणीनुसार व क्रीडा पर्यवेक्षिका क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अहवालनुसार प्रभाग क्र ९ खराळवाडी येथील बालभवन पुरूष व्यायामशाळा हि कामगारनगर मित्र मंडळ कामगारनगर पिंपरी १७ या संस्थेस दि.०२/०२/२०२० पासून पुढे व्यायामशाळा ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२३ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११६/२०२०, दि.१०/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.८० दि.१३/०३/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६३०५ दि.०८/०१/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/०३/कावि/५३/२०२० दि.१५/०१/२०२० अन्वये प्रभाग क्र.२१ येथील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०२/०३/२०१९ ते दि.०१/०२/२०२० या कालावधीकरिता र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/०३/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. प्रभाग क्र.२१ येथील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०३/०२/२०२० पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७२२४ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११७/२०२०, दि.१०/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.८१ दि.१३/०३/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६३०४ दि.०८/०१/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/५४/२०२० दि.१५/०१/२०२० अन्वये प्रभाग क्र.२१ येथील कै.दशरथ कापसे व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०२/०३/२०१९ ते दि.०१/०२/२०२० या कालावधीकरिता र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/०३/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. प्रभाग क्र.२१ येथील कै.दशरथ कापसे व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०३/०२/२०२० पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२५ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/६१४/२०२०, दि.१५/०२/२०२०

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.८२ दि.१३/०३/२०२० बाबत.

विषय क्र.६ मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२६ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – क्रीडा

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.८४ दि.१३/०३/२०२० अन्वये मा.सागर गवळी, मा.विकास डोळस यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील क्रीडा विभागाच्या वतीने दरवर्षी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती अदा केली जाते. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये क्रीडा विभाग क्रीडा धोरण मंजूर झाले असून सदर धोरणामध्ये भाग १ ड शिष्यवृत्ती मधील(१) पान क्रमांक १४ मनपा परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व

संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून मनपा परिसरातील जास्तीत जास्त, राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने राज्यस्तर खेळाडूस र.रु.३०००/- त्यात १०% वाढ करुन र.रु.३३००/- तसेच असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ(राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रु.३०००/- त्यात १०% वाढ करुन र.रु.३३००/- व राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रु.५०००/- त्यात १०% वाढ करुन र.रु.५५००/- या प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेकामी मान्यता दिलेली आहे. सन २०१८-१९ या सालाकरीता शिष्यवृत्ती अदा करणेकामी वृत्तपत्रात प्रेसनोट प्रसिध्द करुन संबंधित विद्यार्थ्याकडून दि.२८/८/२०१९ ते ३०/९/२०१९ पर्यंत अर्ज मागविले होते. त्यानुसार १३५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३ अर्ज हे क्रीडा शिष्यवृत्ती धोरणात बसत नसल्यामुळे अपात्र करण्यात आलेले आहेत. उर्वरीत (प्रमाणपत्रे) अर्ज १) ६७ अर्ज प्रमाणपत्रे पडताळणी करुन घेणेकामी जिल्हा क्रीडा अधिकारी,पुणे २) ३ अर्ज प्रमाणपत्रे विद्यापीठ क्रीडा मंडळ,पुणे यांचेकडे पाठविले होते. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे ४९ यांनी पत्र क्र.क्रीयुसे/पिंचिंमनपा प्रमाणपत्र पड/१८-१९/का-४ दि.२२/०३/२०१९ या अन्वये सदर प्रमाणपत्रे ही सहा.आयुक्त क्रीडा यांचे स्तरावर School Game Fedration of India या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या निकालावरुन छाणनी करुन घेणेत यावीत असे कळविले होते. त्यानुसार संबंधित संकेतस्थळावरुन तपासणी केली असता ५० खेळाडू पात्र आहेत. २ खेळाडूंचे खेलो इंडीयाचे प्रमाणपत्र आहेत. खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची तपासणी करुन एकूण १३५ अर्जातील प्रमाणपत्रांपैकी १२० विद्यार्थी खेळाडूंचे अर्ज मनपाच्या क्रीडा धोरणानुसार पात्र ठरविण्यात आले आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| पात्र/अपात्र | राज्यस्तर | आंतर विद्यापीठ | राष्ट्रीयस्तर | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| पात्र | ६७ | ३ | ५० | १२० | ---- |
| अपात्र | ९ | ० | ४ | १३ | ---- |
| निर्णय राखून ठेवण्यात येत आहे | ० | ० | २ | २ | खेला इंडया (खालील दिलेले आहे.) |
| **एकूण** | **७६** | **३** | **५६** | **१३५** | |

खेलो इंडीया खेळलेल्या २ खेळाडूंचे प्रमाणपत्राबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी हया स्पर्धेसाठी संबंधित वयोगटानुसार ऐच्छीक खेळाडूंना निवड चाचणीसाठी बोलवून त्यातून संघ निवडला जातो. त्यामुळे सदर खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देणेबाबतचे अधिकार आपल्या स्तरावर घेण्यात यावा असे कळविले आहे. मनपा क्रीडा धोरणामध्ये खेलो इंडिया या स्पर्धेचा समावेश नसून या २ खेळाडूंना शिष्यवृत्तीचा लाभ देणेबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेणे आवश्यक आहे उर्वरीत १२० खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ देण्यास हरकत वाटत नाही. तरी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता १२० विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रत्येक शिष्यवृत्ती र.रु. | एकूण खेळाडू | एकूण शिष्यवृत्ती र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तर | ३,३००/- | ६७ | २,२१,१००/- |
| २ | आंतरविद्यापीठ | ३,३००/- | ३ | ९,९००/- |
| ३ | राष्ट्रीय | ५,५००/- | ५० | २,७५,०००/- |
| | | एकूण | १२० | ५,०६,०००/- |

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती बक्षिसे ही सन २०१९-२० आर्थिक वर्षात देय असून सदर लेखा शिर्षावर र.रु.०६,७७,४००/- तरतूद शिल्लक असून या लेखाशिर्षावर सदर क्रीडा शिष्यवृत्तीबील र.रु.५,०६,०००/- खर्ची टाकता येणे शक्य आहे. तरी मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये क्रीडा विभाग क्रीडा धोरण मंजूर झाले असून सदर धोरणामध्ये भाग १ ड शिष्यवृत्ती मधील(१) पान क्रमांक १४ मनपा परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून मनपा परिसरातील जास्तीत जास्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने शिष्यवृत्ती अदा केली जाते. खेलो इंडियाचे खेळाडू यांना क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्याचे धोरण नसल्यामुळे याबाबत निर्णय होईपर्यंत त्याचा निर्णय राखून ठेवणेस व सन २०१८-१९ या वर्षात १२० पात्र विद्यार्थी खेळाडूंना एकूण क्रीडा शिष्यवृत्ती र.रु.५,०६,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख सहा हजार फक्त) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२७ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – निवडणूक

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.नि/१/कावि/२०३/२०२०, दि.३०/०६/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे निवडणूक विभागासाठी मनपा कामकाजास्तव उपलब्ध करुन देणेत आलेले निवडणूक विभागाच्या वापरातील मनपा वाहन क्र.MH-14-CL-1473 (टाटा सुमो) करीता 215/75R15 TT या साईजचे चार नग नविन टायर्स-टयुब मे.सीएट लि. उत्पादीत कंपनी प्रतिक एंटरप्रायझेस, देवाची उरुळी, ता.हवेली, जि. पुणे सासवड रोड यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अगाऊ र.रु.22,845/- (अक्षरी र.रु.बावीस हजार आठशे पंचेचाळीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२८ | विषय क्रमांक – ०९
दिनांक – १०/०७/२०२० | विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/४/कावि/९९/२०२०, दि.०१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मे.ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन, पुणे यांनी टेस्टींग बस प्रस्ताव सादर केला आहे. सदर बस संपूर्णत:वातानुकूलीत असुन सर्व साहीत्यांनी सुसज्ज अशी राहणार आहे. त्यामध्ये त्यांनी कोविड-१९ ह्या टेस्ट जास्तीत जास्त लोकांच्या कशापध्दतीने करता येऊ शकतात याचा आर्विभाव आहे. तसेच बस सर्व प्रभांगामध्ये फिरवण्यात आली तर जास्तीत जास्त नागरिकांची टेस्ट करण्यात येऊन या साथीच्या रोगाला आटोक्यात आणण्यास मदत होणार आहे.

| Sr.No | Package | Description | Rate Per Package |
|---|---|---|---|
| 1 | Package 1 | हेमॅटॉलॉजि( सी.बी.सी.) एक्स-रेटेस्ट/ ई.सी.जीटेस्ट विडाल-टेस्ट सी.आर.पी. टेस्ट तापमान ( टेम्परेचर) तपासणी ऑक्सिजनस्यॅच्युरेशन | 400.00 |

वरील प्रमाणे दरपत्रक प्राप्त झालेले आहे. प्रस्तावा प्रमाणे टेस्ट बस ही मुफ्त (Free of Cost) राहणार आहे. या कामासाठी देण्यात येणारी बस मे.ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन, पुणे यांचे मार्फत पुरविली जाणार आहे. बसचा खर्च, डिझेल, देखभाल दुरुस्ती या साठी त्यांना कोणत्याही प्रकारचा खर्च आदा केला जाणार नाही. याची सदर कामाची मुदत १ वर्ष कालावधीसाठी राहणार आहे. वरील प्रमाणे टेस्ट राहणार आहेत. सबब, वरील प्रमाणे मे.ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन, पुणे ह्यांचे कडुन टेस्टबस चा प्रस्ताव सादर केला असून प्रथम टप्प्यात १०००० नागरीकांची टेस्ट करणे प्रस्तावीत आहे. या कामी र.रु.४०,००,०००/- लाख (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चास महापालिका अधिनियम कलम ६७ (३) क नुसार संबंधीतांशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२२९ | विषय क्रमांक – १०
दिनांक – १०/०७/२०२० | विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/४/कावि/१००/२०२०, दि.०१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा मार्फत विविध पध्तीने, वेगवेगळ्या पध्दतींचा अवलंब करुन नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते. विविध आजारांविषयी, स्वच्छ

भारत अभियान अंतर्गत येणा-या विविध मोहीमा, सध्या कोरोना व्हायरसचा सर्वत्र वाढता प्रादुर्भाव, इ बाबत माहीती होणे कामी मनपा हद्दीतील भिंती रंगविण्यात येतात त्यावर नागरिकांना समजतील अशी चित्रे काढण्यात येतात तसेच त्या मध्ये घोषवाक्य लिहीलेली असतात. त्या द्वारे लोकांमध्ये संबंधीत विषया बद्दल जागृती होते. प्रत्येक प्रभागातील १०X१० स्क्वे. फूटची एक भिंत या प्रमाणे रंगविणेकामी सांगितले जाते. मे.ओम एन्टरप्राईजेस यांनी कोरोना व्हायरस व त्या अनुषंगाने येणा-या इतर आवश्यक त्या विषयांवर जनजागृती करणेकामी आकर्षक पध्दतीने स्लोगन व चित्रे रंगविणेबाबत काम मिळणे बाबत दिनांक ०२.०६.२०२० रोजी पत्र सादर केले आहे सदर पत्रावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी पुढील कार्यवाहीसाठी वैद्यकीय विभागाकडे पाठविले आहे. मे.ओम एन्टरप्राइजेस यांचा दर र.रु.६६३.०४ + जिएसटी प्रती स्क्वेअर मिटर आलेला आहे. पर्यावरण विभागाकडील निविदा ENV/04/05-2018-19 अन्वये प्रसीध्द केलेल्या निविदेमध्ये त्यांना कामाचे आदेश क्र.पअक/१/कावि/४६/२०१९ दि.०६.०२.२०१९ अन्वये देण्यात आलेले आहेत त्यामध्ये वॉटर प्रुफ (अँपेक्स पेंट) पाच वर्षाच्या गॅरंटी सहीत देण्यात आलेले आहेत. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार कोरोना (COVID 19) या साथीच्या रोगावर उपचारासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७ (३) (क) नुसार तात्काळ खरेदी कामी अन्वये आदेश देता येणे शक्य आहे किंवा कसे? आणि जर आदेश देण्यास मान्यता झालेस पुर्नप्रत्यायी आदेश हा मुळ आदेशाच्या ५० टक्के रकमेएवढा देता येणे शक्य आहे. या प्रमाणे पर्यावरण विभागाकडील या कामासाठी त्यांना ३४.४७ लाखाच्या ५० टक्के म्हणजेच र.रू.१७,२०,०००/- (अक्षरी र.रू.सतरा लाख वीस हजार फक्त) पर्यंत रकमेचे आदेश देणेस व संबंधीतांशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ७२३० | विषय क्रमांक – ११ |
| दिनांक – १०/०७/२०२० | विभाग – मध्य.भां.वैद्यकिय |
| सुचक – मा.झामाबाई बारणे | अनुमोदक – मा.आरती चोंधे |

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४३/२०२०, दि.०१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे कोविड-१९ उपचाराकरीता समर्पित करण्यात आलेले असून कोरोना बाधित रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी १६ स्वतंत्र कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत काढण्यात आलेल्या Expression of Interest करीता M/s.Jai Bhawani Enterprises यांनी फेर सादर केलेला दर र.रु.२८,०२१.१५ (PCMC Provided PPE Kit) सर्वात कमी असून त्यांनी सादर केलेल्या दराप्रमाणे मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी १६ कर्मचारी प्रतिमहा र.रु. ४,४८,३३८/- प्रमाणे ६ महिनेकरीता किमान वेतन कायद्यास अधिन राहून उपलब्ध करुन देणेकामी येणा-या

र.रु.२६,९०,०३०/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख नव्वद हजार तीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३१ विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – औ.प्र.कें., मोरवाडी

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.औप्रसं/४/कावि/४९३/२०२०, दि.२९/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी येथे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणेकरिता मा.अति. आयुक्त सो.यांचेकडील आदेश क्र:औप्रसं/०४/कावि/५१/२०२०, दि.१७/०१/२०२० अन्वये खालील कर्मचा-यांना दि.०९/१२/२०१९ ते दि.०८/०६/२०२० या सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित र.रू.३०,०००/- (अक्षरी र.रू. तीस हजार फक्त) नेमणूक देण्यात आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी दि.०८/०६/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. खाली नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांनी नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

**प्रपत्र 'अ'**

| अनु. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती.सातकर उज्वला लक्ष्मण | मानधन निदेशक |
| २ | श्री.काळोखे विक्रमसिंह वसंत | मानधन निदेशक |
| ३ | श्री.लांडगे निलेश खुशालचंद | मानधन निदेशक |
| ४ | श्री.दुधाळ भानुदास धर्माजी | मानधन निदेशक |
| ५ | श्रीमती.बोरसे वृंदावनी बन्सीलाल | मानधन निदेशक |
| ६ | श्री.ताठे शहाजी पांडूरंग | मानधन निदेशक |
| ७ | श्री.शिंदे प्रकाश शिवाजी | मानधन निदेशक |
| ८ | श्रीमती.जाधव सीमा यशवंत | मानधन निदेशक |
| ९ | श्री.गावडे किसन दत्तात्रय | मानधन निदेशक |

उपरोक्त अनु.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.१०/०६/२०२० ते दि.०९/१२/२०२० पर्यंत सहा महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३२ विषय क्रमांक – १३
दिनांक –१०/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ– मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/५४/२०२०, दि.०२/०७/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.०६.२०२० ते दि.२१.०६.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/५४/२०२०, दि.०२/०७/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३३ विषय क्रमांक – १४
दिनांक –१०/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ– मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/५५/२०२०, दि.०२/०७/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.०६.२०२० ते दि.२८.०६.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/५५/२०२०, दि.०२/०७/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७२३४ विषय क्रमांक – १५
दिनांक –१०/०७/२०२० विभाग – फ क्षेत्रीय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/वि/जा/१७७/२०२०, दि.०३/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र 11 घरकुल योजना चिखली येथील D5, D6, D7, D8 या इमारती मध्ये COVID-19 या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी COVID CARE CENTER (CCC) व अलगीकरण (INSTITUTIONAL QUARANTINE) सेंटर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र प्रशा/1/कावि/1226/2020दिनांक 25/06/2020 अन्वये स्थापन करण्यात आले आहे. तसेच मा.अतिरिक्त आयुक्त (2) व मा.अतिरिक्त आयुक्त (3),

मा.क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय यांचे दिनांक 22/06/2020 चे पाहणी दरम्यान सदर ठिकाणी विद्युत विषयक कामकाज करणेबाबत व तात्पुरत्या स्वरुपात वीजमीटर बसविणेबाबत तोंडी सूचना केलेल्या आहे.त्याकरिता प्रभाग क्र 11घरकुल योजना चिखली येथीलCOVID CARE CENTER (CCC) चे D5, D6, D7, D8 या इमारतीकरिता वीजपुरवठा करण्यास तात्पुरत्या स्वरुपात नवीन वीजमीटर बसविणेकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस कळविले असता त्यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रति इमारत 2 वीजमीटर या प्रमाणे 8 फर्म कोटेशनचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | वीज मीटरचे ठिकाण | ग्राहक क्रमांक | फर्म कोटेशन क्रमांक व दिनांक | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|
| 1 | The Commissioner PCMC D8<br>Building No – D8,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870425 | क्रमांक :- 26896833<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 2 | The Commissioner PCMC D8<br>Building No – D8,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870433 | क्रमांक :- 26896784<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 3 | The Commissioner PCMC D7<br>Building No – D7,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870417 | क्रमांक :- 26896739<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 4 | The Commissioner PCMC D7<br>Building No – D7,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870409 | क्रमांक :- 26896704<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 5 | The Commissioner PCMC D6<br>Building No – D6,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870361 | क्रमांक :- 26896674<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 6 | The Commissioner PCMC D6<br>Building No – D6,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870387 | क्रमांक :- 26896631<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 7 | The Commissioner PCMC D5 Building No – D5,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870395 | क्रमांक :- 26896473<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| 8 | The Commissioner PCMC D5<br>Building No – D5,Sect No 17, 19 Gharkul, ChikhaliPimpriChinchwad (M Corp)<br>Pin Code - 411062 | 170104870379 | क्रमांक :- 26896538<br>दिनांक :- 29/06/2020 | 25376 |
| | | | एकूण | 2,03,008 |

उपरोक्त नमुद ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात वीजमीटर बसविणेकामी फर्म कोटेशन नुसार र.रु.2,03,008/-(अक्षरी र.रू.दोन लाख तीन हजार आठ रुपये फक्त) अदा करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने कळविले आहे.सदरची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. प्रभाग क्र.11 घरकुल योजना चिखली येथील COVID CARE CENTER (CCC) चे D5, D6, D7, D8 या इमारती करिता वीजपुरवठा करण्यास

तात्पुरत्या स्वरुपात नवीन वीजमीटर बसविणेकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांस र.रु.2,03,008/- (अक्षरी र.रू.दोन लाख तीन हजार आठ रुपये फक्त) अदा करणेस व सदरचा खर्च विद्युत मुख्य कार्यालयाकडील नवीन वीज मिटर या लेखाशिर्षामधून करणेस तसेच सदर इमारतीचे दरमहा येणार वीजबिल महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करणे आवश्यक असल्याने सदरचे बिल फ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील वीजबिले या लेखाशिर्षामधून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३५ विषय क्रमांक – १६

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/लेखा/९/१७५/२०२०, दि.१७/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉक डाऊन जाहिर करण्यात आले व संचार बंदी लागू करण्यात आली. सन २०१९-२० मधील एकूण ६९० विकास कामांची बिले अदा करणे प्रलंबित होती. परंतू वरील आपत्कालीन परिस्थितीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाहीत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्या पुर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बिले संबंधितास अदा करणे आवश्यक आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रलंबित बिलांची यादी या विभागाकडे सादर केलेली आहे. सोबत कामनिहाय यादी जोडणेत आलेली आहे.

| अ.क्र. | मुख्यालय | कामांची संख्या | अदा करावयाची र.रू. |
|---|---|---|---|
| १ | अ मुख्यालय | ८४ | २०,४५,७९,५६२ |
| २ | ब मुख्यालय | ४९ | १३,८५,६२,६२९ |
| ३ | क मुख्यालय | ७६ | २९,६१,७४,०६४ |
| ४ | ड मुख्यालय | ४९ | २३,०७,९४,६७७ |
| ५ | ई मुख्यालय | ७७ | ३०,७३,०१,५९० |
| ६ | फ मुख्यालय | ८७ | १६,४१,९५,२७७ |
| ७ | ग मुख्यालय | ७३ | १७,०६,६०,४५१ |
| ८ | ह मुख्यालय | ९० | १७,४७,७७,३६६ |
| ९ | उद्यान | ४४ | ६,१८,२४,००० |
| १० | बीआरटीएस | २० | १९,५३,४३,५३१ |
| ११ | मुख्य कार्यालय | ४१ | १३,९८,११,०१२ |
|  | **एकूण** | **६९०** | **२०८,४०,२४,१५९** |

वरील यादीत नमुद केलेल्या बिलांपैकी काही बिले माहे एप्रिल २०२० मध्ये अदा केलेली असल्याने त्या बिलांना कार्योत्तर मान्यता व उर्वरित अदा करावयाच्या बिलांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०२ नुसार अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३६ विषय क्रमांक – १७

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/१/कावि/१६९/२०२०, दि.०१/०७/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

बालाजी विधी महाविद्यालय ताथवडे मध्ये कोविड-१९ अलगीकरण केंद्र (COVID CARE CENTERE) स्थापण केलेले आहे. सध्या सदर ठिकाणी लोकांना कोविड-१९ अलगीकरण केंद्रा मध्ये ठेवणेत आलेले आहे. तथापी दिवसा व रात्रीच्या वेळेस लाईट गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरीकांची गैरसोय होत आहे त्या मुळे सदर ठिकाणी जनरेटरची सोय करणेत यावी तसेच विद्युत व्यावस्था व त्या अनुषांघीक कामकाजा करीता २४ तास वायरमन कर्मचारी त्वरीत नेमणुक करणेत यावी अशी मागणी मा. प्रभाग अधिकारी ड क्षेत्रिय कार्यालय पिपरी चिंचवड महानगर पालिका व डॉ. सुनिल पवार यांनी पत्र क्र.डक्षेका/१/कावि/३३०/२०२० दिनांक १८/६/२०२० चे पत्रान्वये करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता तात्पुरत्या तेथे स्वरूपात ६२.५ केव्हीए चा जनरेटर बसवावा लागेल त्याचा प्रति महीना साठीचा खर्च र.रू.१,१८,८००/- तसेच अकुशल कर्मचारी यांचे किमान वेतन प्रती महीना र.रू.२२,८३०/- असे आहे. सदर साठी टेकेदारी पध्दतीने ३ पाळ्यांमध्ये कामगार नेमणुक करणे करीता. सद्य स्थितीत अंदाजे ४ महीने करीता सदर व्यावस्था कार्यान्वीत ठेवणे करीता एकुण र.रू.६,६३,२५१/- इतका खर्च अपेक्षित आहे. तात्पुरत्या स्वरूपात जनित्र संच बसविणेचे काम गत वर्षि प्रमाणे मे. मोरया मंडप डेकोरेटर्स यांचे निविदा नोटीस क्र.२/१६ २०१९-२० चे अन्वये १.६% कमी दराने करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. सबब सदरचा खर्च मुख्य कार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा कडील "कोरोना निधी" या निधीतुन र.रू.६,६३,२५१/- (अक्षरी र.रू.सहा लाख त्रेसष्ठ हजार दोनशे एक्कावन्न फक्त) खर्च करणेचा तसेच मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांचे अंदाजपत्रकिय रकमे पेक्षा १.६% कमी दराने थेट पध्दतीने काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६५९/२०२०
दिनांक – १३/०७/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**